# प्रसिध्दी पत्रक

दिनांक : २८/०३/२०२४

**डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैदयकीय महाविद्यालय व रूग्णालय कर्मचारी सहकारी पतसंस्थेचे वरिष्ठ लिपीक आलोसे गुलाब मोरे यांनी गट विमा योजनेचे व रजा रोखीकरणाचे बिल काढण्यासाठी विस हजारांची लाच मागणी केल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नादेड यांचे जाळ्यात**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड युनिट |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | पो.स्टे.नांदेड ग्रामिण गुरनं २४८/२०२४ कलम ७ अ भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा १९८८ |
| गुन्हा दाखल तारीख व वेळ | दिनांक २७/०३/२०२४ रोजी २१.३८ वा. |
| आरोपी लोकसेवक यांचे नाव, हुददा व पत्ता | गुलाब श्रीधरराव मोरे, वय ५१ वर्षे, पद – वरिष्ठ लिपिक, नेम. डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैदयकीय महाविद्यालय व रूग्णालय कर्मचारी सहकारी पतसंस्था, विष्णुपुरी, नांदेड रा. रामनगर कौठा, नांदेड ता. जि. नांदेड |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | २०,००० /– रूपये |

**थोडक्यात माहिती**

तक्रारदार हे डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय महाविद्यालय व रूग्णालय, विष्णुपुरी, नांदेड येथून औषध निर्माता या पदावरून सेवानिवृत्त झाले आहेत. डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय महाविद्यालय व रूग्णालय, विष्णुपुरी, नांदेड येथील प्रशासकीय अधिकारी बालाजी बोधगिरे यांनी व आरोपी लोकसेवक वरिष्ठ लिपिक गुलाब मोरे यांनी फिर्यादी यांना गट विमा योजनेचे बिल काढतो, परंतू यापूर्वी रजा रोखीकरणाचे काढलेल्या बिलाचे बक्षिस म्हणून रू. २०,०००/– द्यावे लागतील नाही तर गट विमा योजनेचे बिल लवकर काढणार नाही असे सांगितल्याने तक्रारदार यांनी आलोसे यांना गटविमा योजनेचे बिल निघाल्यानंतर काढलेल्या बिलाचे बक्षिस म्हणून रू. २०,०००/– देण्यास नाइलाजास्तव होकार दिला. तक्रारदार यांचे दि. ०१.०३.२०२४ रोजी गट विमा योजनेचे बिल जमा झाले. जमा झालेल्या बिलाचे बक्षिस रू. २०,०००/– ही रक्कम लाच असल्याची तक्रारदार यांना माहिती असल्याने व त्यांना ती देण्याची इच्छा नसल्याने, त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड येथे याबाबत तक्रार दिली.

त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेडकडून दिनांक ०२.०३.२०२४ रोजी लाच मागणीची पडताळणी केली असता, पडताळणी दरम्यान यातील आरोपी लोकसेवक वरिष्ठ लिपिक गुलाब मोरे यांनी तक्रारदार यांचे प्रशासकीय अधिकारी बालाजी बोधगिरे यांनी रजा रोखीकरणाचे व गट विमा योजनेच्या काढलेल्या बिलाच्या कामाचे बक्षिस म्हणून रू.२०,०००/– स्वतःचे फायदयाकरिता पंचासमक्ष मागणी केल्याचे निष्पन्न झाले आहे.

आज दि. २७.०३.२०२४ रोजी तक्रारदार यांना आरोपी लोकसेवक वरिष्ठ लिपिक गुलाब मोरे याच्याकडे पंचासह लाच स्विकृती साठी पाठविले असता, त्यांना संशय आल्याने त्यांनी लाचेची रक्कम स्विकारली नाही.

नमुद प्रकरणात आरोपी लोकसेवक वरिष्ठ लिपिक गुलाब श्रीधरराव मोरे यांना ताब्यात घेवुन पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण, ता. जि. नांदेड येथे गुन्हा दाखल करण्यात आला.

| | |
|---|---|
| सापळा पथक | सदरची कार्यवाही ला.प्र.वि. नांदेड परिक्षेत्र, नांदेड चे पोलीस अधीक्षक डॉ.राजकुमार शिंदे, यांचे मार्गदर्शनाखाली, पर्यवेक्षण अधिकारी पोलीस उप अधीक्षक राजेंद्र पाटील, तसेच सापळा कार्यवाही पथक पोलीस निरीक्षक जमिर नाईक, प्रिती जाधव सपोउपनि गजेंद्र मांजरमकर, मपोह मेनका पवार,पोना/बालाजी मेकाले, पोकॉ/सय्यद खदीर, पोकॉ/अरशद खान, पोकॉ/ईश्वर जाधव, चापोना/प्रकाश मामुलवार, सर्व लाप्रवि नांदेड युनिट |
| गुन्हयाचा तपास | श्रीमती स्वप्नाली धुतराज, पोलीस निरीक्षक, अँटी करप्शन ब्युरो, नांदेड |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबददल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा.



| संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड, नागार्जुनसागर बिल्डील स्नेहनगर/श्रीनगर नांदेड | |
|---|---|
| संपर्क कमांक :– 02462–253512<br>टोल फ्री कमांक– 1064 | ऑनलाईन तकार ॲप्लीकेशन acbmaharashtra.net |
| मा. पोलीस अधीक्षक 9623999944 | पोलीस उपअधीक्षक 7350197197 |
| ई–मेल आयडी<br>spacbnanded@mahapolice.gov.in | ई–मेल आयडी<br>dyspacbnanded@mahapolice.gov.in |
| FACEBOOK – Dysp Acb Nanded | TWITTER - @ACBnanded |
| INSTAGRAM – acb_nanded | |



पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड

Scanned with CamScanner